महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु ४०१०९ एमएच २००५ एसजीसी १५३६४५
वाणिज्य विभाग, प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
संकेतस्थळ : www.mahadiscom.in, ई-मेल cecommho@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

क्र. मु.अ.(वा)/उपसा जलसिंचन योजना/ 027394 दिनांक : 19 OCT 2022

**वाणिज्य परिपत्रक क्र. ३३९**

**विषय: शासन निर्णय दि.२५/०८/२०२२ अन्वये अतिउच्चदाब, उच्चदाब व लघुदाब उपसा जलसिंचन योजना ग्राहकांना वीज दरात सवलत देण्याबाबत.**

**संदर्भ:** १. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३८२/ऊर्जा-५, दि. ३१/०१/२०१९
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.११८/ऊर्जा-५, दि. २५/०८/२०२२

उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील उच्चदाब जलसिंचन योजनांना रु.१.१६ प्रती युनिट हा सवलतीचा वीज दर आकारण्यात येत होते. तथापि, शासनाचा सुधारीत निर्णय अप्राप्त असल्यामुळे माहे जून २०२१ पर्यंत सदर सवलतीच्या दरानुसार वीज देयके आकारण्यात आली. तद्नंतर मा. विद्युत नियामक आयोगाने दि.३०/०३/२०२० च्या आदेशानुसार उच्चदाब जलसिंचन योजनांना वीज देयके देण्यात आलेली होती.

संदर्भ क्र.२ मध्ये नमूद शासन निर्णयान्वये राज्यातील अतिउच्चदाब, उच्चदाब व लघुदाब उपसा जलसिंचन योजना ग्राहकांना वीज दरात सवलत देण्याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:

**शासन निर्णय:**

१. अतिउच्चदाब व उच्चदाब उपसा जलसिंचन योजनांमधील ग्राहकांना दि.०१ जून, २०२१ पासून सदर ग्राहकांनी भरावयाचा सवलतीचा वीजदर रु.१.१६ प्रति युनिट व स्थिर आकारामध्ये रु.२५ प्रति KVA इतकी सवलत कायम ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे. मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाद्वारे या ग्राहकांना वेळोवेळी निश्चित केलेल्या वीजदरातून ग्राहकाद्वारे भरण्यात येणारी रक्कम वगळता उर्वरित प्रति युनिट व प्रति KVA दरातील रक्कम यापोटी महावितरण कंपनीस त्या त्या वर्षी शासनामार्फत प्रत्यक्ष वीज वापरानुसार रक्कम परिगणित करुन अनुदान स्वरुपात देण्यास मान्यता देण्यात येत आहे. राज्य शासनाद्वारे देण्यात येणाऱ्या सदर सवलतीचे दर दि.३१ मार्च, २०२३ पर्यंत कायम ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. दि.०१.०४.२०२० ते दि.३१.०५.२०२१ या कालावधीत महावितरण कंपनी मार्फत अतिउच्चदाब व उच्चदाब उपसा जलसिंचन योजना ग्राहकांना देण्यात आलेल्या रु.१.१६ प्रति युनिट व स्थिर आकारामध्ये रु.२५ प्रति केव्हीए इतक्या सवलतीस कार्योतर मान्यता देण्यात येत आहे. तसेच त्याअनुषंगाने सन २०२०-२१ या संपूर्ण आर्थिक वर्षात सदर ग्राहकांना देण्यात आलेली सवलत रु.२६३.६३ कोटी व सन २०२१-२२ या वर्षातील माहे एप्रिल व माहे मे २०२१ या दोन महिन्यात देण्यात आलेली सवलत रु.८७.९४ कोटी अशी एकूण सुमारे रू.३५१.५७ कोटी महावितरण कंपनीस अनुदान स्वरुपात देण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

३. लघुदाब उपसा जलसिंचन ग्राहकांना रु. १.० प्रति युनिट हा सवलतीचा दर व स्थिर आकारात रु.१५/ HP/month इतकी सवलत दि. ०१ जून २०२१ पासून नव्याने देण्यास मान्यता देण्यात येत आहे. यापोटी महावितरण कंपनीस होणाऱ्या वार्षिक महसुली तुटीची भरपाई शासनामार्फत महावितरण कंपनीस अनुदान स्वरुपात देण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर सवलतीचे दर दि.३१ मार्च, २०२३ पर्यंत कायम ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**वरील शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत:**

१) अतिउच्चदाब व उच्चदाब उपसा जलसिंचन योजना ग्राहकांना दि.०१ जून २०२१ पासून सवलतीचा दर रू.१.१६ प्रति युनिट व स्थिर आकारात रू.२५ प्रति केव्हिए सवलत लागू करण्यात येत आहे.

२) लघुदाब उपसा जलसिंचन योजना ग्राहकांना दि.०१ जून २०२१ पासून सवलतीचा दर रू.१.०० प्रति युनिट व स्थिर आकारात रु.१५ प्रति अश्वशक्ती प्रति महिना सवलत लागू करण्यात येत आहे.

३) माहे ऑगस्ट २०२२ च्या देयकापासून (माहे सप्टेंबर २०२२ मध्ये वितरीत होणारे देयक) उपरोक्त निर्देश क्र.१ व २ मध्ये नमूद सवलतीच्या दरांची अंमलबजावणी करण्यात यावी.

४) सदर ग्राहकांना देय असलेली दि.०१ जून २०२१ ते दि.३१ जुलै २०२२ पर्यंतच्या पूर्वकालावधी सवलतीच्या अनुदानाच्या रक्कमेची मागणी शासनाकडे करण्यात येईल. सदर अनुदान शासनाकडून प्राप्त झाल्यानंतर सदर सवलतीचा लाभ संबंधित उपसा जलसिंचन योजना ग्राहकांना त्यांच्या पुढील देयकांमध्ये समायोजनाद्वारे देण्यात येईल.

माहिती व तंत्रज्ञान विभागास विनंती आहे की, माहे ऑगस्ट २०२२ च्या देयकापासून सुधारीत शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी.

तसेच सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सुचित करण्यात येते की, वरील निर्देशांचे पालन करून शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी.

**संचालक (वाणिज्य)**
**महावितरण**

**प्रत:**
प्रेषण यादीप्रमाणे.